# कार्तिक वारी पूर्ववत करण्यासाठी अखिल भाविक वारकरी मंडळाची मागणी



**सोलापूर, (प्रतिनिधी) :** कोरोना महामारीमुळे सध्या महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाच्या सर्व परंपरांवर निर्बंध घालण्यात आले होते. ते सर्व निर्बंध आता शिथिल करून महाराष्ट्रातील सर्व वारकऱ्यांचे श्रद्धास्थान असणारे वारी आणि वारकरी परंपरेतील कार्तिकी वारी सध्या पूर्ववत सुरू करण्यासाठी प्रशासनाने सहकार्य करावे या पद्धतीचा निवेदन अखिल भाविक वारकरी मंडळाच्या माध्यमातून सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये निवासी उपजिल्हाधिकारी यांना देण्यात आलेले आहे.

जिल्हाधिकारी यांच्या बरोबर यासंबंधी कार्तिक वारीसंदर्भात चर्चाही करण्यात आलेली आहे. कार्तिक वारी ही झालीच पाहिजे यंदाची कार्तिक वारी आम्ही करणारच असा निर्धार वारकरी मंडळींनी केलेला आहे. त्याच बरोबर दिंड्या, पालखी सोहळा पूर्ववत करून पंढरपूर येथील ६५ एकर मध्ये असणारे सर्व सोयीसुविधा व त्या ठिकाणी उपलब्ध असलेली जागा वारकऱ्यांना देण्यात यावी. चंद्रभागा नदीचे स्नान, पंढरपूर नगर प्रदक्षिणा, वारकरी संप्रदायाच्या सर्व परंपरा करण्यासाठी अधिकृत परवानगी देऊन सहकार्य करावे या पद्धतीचे निवेदन देण्यात आलेले आहे.जर कार्तिक वारीला परवानगी नाही दिली तर अखिल भाविक वारकरी मंडळाच्या माध्यमातून महाराष्ट्र बर आंदोलन उभे केले जाईल अशी ही सूचना असा संदेश लेखी निवेदनातून प्रशासनासमोर मांडण्यात आलेला आहे. सध्या सर्व क्षेत्रामध्ये निर्बंध शिथिल झालेले आहे.

कोणाचा प्रसार कमी झालेला असल्यामुळे कार्तिक वारीला परवानगी देऊन सहकार्य करावे या पद्धतीचे निवेदन देण्यात आले. हे निवेदन देत असताना अखिल भाविक वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष सुधाकर महाराज इंगळे, राष्ट्रीय सचिव बळीराम जांभळे वारकरी मंडळाचे सोलापूर जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष ज्योतीराम चांगभले, वारकरी मंडळाचे जिल्हा सचिव मोहन महाराज शेळके, वारकरी मंडळाचे सोलापूर शहराध्यक्ष संजय पवार व पदाधिकारी उपस्थित होते.

**शनिवार दि. २३ ऑक्टोबर २०२१**
।।श्री।।
३–६







## ज्योतिषविषयक

● **भाग्याच अचूकवेध घेण्यासाठी** हस्तरेषेवरून अचूक भविष्य! विवाह केव्हा? कोठे? भाग्योदय कोणत्या क्षेत्रात? वेळ ठरवून भेटा. पलास गुरुजी, शनिपार, पुणे. ९८२२७८४३५२.

● **सुनेत्रा भविष्य कार्यालय,** ज्योतिषी : नंदकिशोर चंद्रकांत उमराणी, मार्केटयार्ड, पुणे–३७. दूरभाष : ९८२२१९९६८०, ८०८७८३२३२४. भविष्य मार्गदर्शनासाठी भेटा.

## शैक्षणिक

● **टि.म.वि.तर्फे महिलांसाठी डेंटल असिस्टंट सर्टि कोर्स. फी रू.१२,०००/– वेळ स.७–१० कालावधी १ महिना, शनिवार पेठ, नोकरीच्या भरपूर संधी संपर्क : ९६६५७३४६९७**

● **त्वरा करा ! मर्यादित प्रवेश!** टिमवि, जॉयलँड प्री–स्कूलसाठी प्रवेश सुरू ! प्ले–ग्रुप, नर्सरी, ज्युनिअर केजी, सीनिअर केजी आणि पाळणाघर सुद्धा ! संपर्क – ०२०–२४४०३१११/१२, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, मुकुंदनगर, गुलटेकडी, पुणे–३७

## विवाहविषयक

● **जाहीर शोक प्रदर्शन आणि पुनर्मिलन** दो हंसोका जोडा बिछड गयो पैकी जे कोरोनामध्ये हयात आहेत. त्यांच्यासाठी विनामूल्य वधू–वर संशोधन ९३०९८९१९५४/०२१३५–२३२४१८ मुक्त आंतरराष्ट्रीय विवाह संस्था.

● **वधू–२४, ५.३, गोरी, बारावी,** शिवणकाम, दत्तक एकुलती एक मुलीसाठी सर्वजातीय वर पाहिजे, शेती ३ एकर, शेतकरी नोकरदार व्यावसायिक चालेल ७५१७०४९१७३, ७६६६६२९३७०.

## आरोग्यविषयक

● **निद्रानाश, अशक्तपणा, मुंग्या** येणे, रक्तदाब, अस्थमा, मानसिक तणाव, सांधेदुखी, ॲसिडिटी, चक्कर येणे, वजन, स्नायुपेटके इत्यादी कमी करण्यासाठी बिनऔषध सोपा उपाय भेटा– निर्मला ९६२३०२५१२९/०२०२६४३४२५८.

## नोकरीविषयक

● **J.S.S. S.M.T. C.K.** GOYAL COLLEGE, DAPODI, Eligible Candidates are invited For Walk in Interview For The C.H.B. Post Of Economics-03, English-01, Marathi-01, Commerce-04, Geography-02, Interested Candidate should Report On 17/09/2021 At 11.00 A.M. In The College Office.

## धार्मिक

● **२०२२ साली माऊली पालखीची** परवानगी असावी. आम्ही आपले नियम पालन करु. तसेच दिंडी चालक यांना योग्य ते मानधन मिळावे. मुकुंद नामदेव वाघमारे पालखी सोहळा प्रकाशक श्री. ज्ञानेश्वर महाराज संस्थान, जनसंपर्क अधिकारी ९३०९८९१९५४ वारकरी संस्था, दिंडी–१, रथापुढील चालविण्यास देणे आहे.


**निवेदन**

''केसरी'' दैनिकांतील जाहिराती या जाहिरातदारांनी दिलेल्या मजकुरानुसार छापल्या जातात. या मजकुराच्या सत्यतेबाबतची खातरजमा वाचकांनी स्वतःच्या जबाबदारीवर करावयाची आहे. केसरी–मराठा ट्रस्ट याबाबत कोणतीही आर्थिक व कायदेशीर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष जबाबदार राहणार नाही. – **व्यवस्थापक**


# युवती सेनेच्या पदाधिकाऱ्यांच्या उद्या सोलापुरात मुलाखती

**सोलापूर, (प्रतिनिधी) :** युवती सेनेच्या सोलापूर शहर, शहर मध्य, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर व अक्कलकोट तालुक्यासाठी युवती पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात येणार असून त्यासाठी उद्या रविवारी २४ ऑक्टोबर रोजी दुपारी ४ वाजता शासकीय विश्रामगृहात युवतींच्या मुलाखती होणार आहेत. युवा सेनेच्या राज्य सचिव दुर्गाताई शिंदे, युवा सेनेचे राज्य विस्तारक तथा सहसचिव विपुल पिंगळे, युवती सेनेच्या राज्य सहसचिव अश्विनी पवार, शर्मिला येवले या युवतींसाठी पदाधिकारी निवडीच्या मुलाखती घेणार आहेत. तत्पूर्वी सकाळी ११ वाजता पंढरपूर येथील शासकीय विश्रामगृहात ग्रामीण भागातील सांगोला, माळशिरस, माढा, करमाळा, पंढरपूर व मंगळवेढा या तालुक्यातील युवतींच्या मुलाखती पार पडणार आहेत. युवा सेनेचे प्रमुख तथा पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे यांच्या आदेशाने युवा सेनेचे राज्य सचिव वरुण सरदेसाई यांच्या मार्गदर्शनाखाली या मुलाखती होणार आहेत. राज्यात युवा सेनेच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून युवकांचे प्रश्न सोडविण्यात येत आहेत. याच पार्श्वभूमीवर आता युवती सेनासुद्धा कार्यरत झाली आहे. राज्यात अनेक जिल्ह्यात युवती सेनेसाठी मुलाखती झाल्या असून आता सोलापुरात यासाठी रविवारी मुलाखती होणार आहेत.

# दीपावलीच्या पणत्यांसाठी कुंभारांच्या भट्ट्या पेटल्या

## पणत्यांची विक्री मोठी : कमाई मात्र छोटी, माती महागली : सरपण मिळेना





**सोलापूर, (प्रतिनिधी) :** दीपावलीचा सण जवळ आल्यामुळे शहर जिल्ह्यातील कुंभार वाड्यामध्ये पणत्या बनवण्याच्या कामाला वेग आला आहे. गतवर्षी कोरोणाच्या महामारीमुळे दीपावलीचा सण म्हणाव तसा साजरा झाला नाही. त्यामुळे सर्वच व्यवसायिकांचे व्यवसाय ठप्प झाले होते. मात्र यंदा कोरोनामुळे थोडीशी फुरसत मिळाल्याने व मायबाप सरकारने सर्व व्यवहार सुरळीत केले आहेत. त्यामुळे यंदाच्या सणात तरी गतवर्षीचे नुकसान भरून निघेल या अपेक्षेने कुंभारानी पणत्या बनवण्यासाठी पुनश्च भट्ट्या पेटवल्या आहेत. शहरातील लष्कर भागातील कुंभार वाड्यातून भटक्यांचा धूर निघत आहे. सध्या कोणत्या बनवण्यासाठी मातीची घरी वाढले आहेत आणि जळणाचे दर वाढले आहेत. एक वेळा माती मिळते,पण भट्टीसाठी सरपण मिळत नाही.

दिपावली हा अर्थात दिव्यांचा उत्सव मानला जाणारा सण. मनामनातील, वातावरणातील अंधकार रूपी दुःख, काळजी, उद्वेग दूर करता, सौख्याचा भरभराटीचा प्रकाश सर्वत्र पसरणारा हा दिव्याचा सण. दीपज्योती नमोस्तुते असं शुभंकरोती मध्येही म्हटलं जाते. दिवाळी हा प्रकाशाचा महिमा आहे. दिवाळीचे एक वेगळेच वातावरण असते. काळ बदलला. घरं बदलली. सहाजिकच सणच स्वरूपही बदललं. पण वाडा असो की चाळ. बगला असो वा फ्लॅट, सार काही उजळून टाकण्यासाठी, प्रकाशित करण्यासाठी, मातीची पणती ही हवीच. मंद, शांत प्रकाश तेवणाऱ्या पणतिच्या प्रकाशाने मनाला जी तृप्तता जाणवते. ती तृप्तता विद्युत रोषणाईच्या शेकडो मळांच्या लखलखाटात जाणवत नाही. म्हणून मातीच्या पणतिचा उजेड असावा, असा हट्ट बुजुर्ग धरतात. बाजारपेठेमध्ये सध्या आकर्षक आणि वेगवेगळ्या रंगाच्या पणत्या उपलब्ध असल्या तरी मातीच्या पणतिची सर येत नाही.

### महागाईमुळे व्यवसाय परवडत नाही

पणति बनवण्याचा व्यवसाय हा सध्या उत्पन्नापेक्षा घाट्याचाच झाला आहे. त्यामुळे तरुण वर्ग या पारंपरिक व्यवसायाकडे वळत नाही. यामध्ये काहीच परवडत नाही. सध्या मातीचे दर वाढले आहेत. पन्नास रुपयाला टोपलंभर माती मिळते. पणती बनवण्यासाठी लागणारे इतर साहित्यही महागले आहे माती चाळण्याची मेहनत मोठी आहे. त्यानंतर चिकल तुडवणे, गोळे करून पणत्या बनवणे या मेहनतीच्या कामांमध्ये वेळ खूप जातो .पणत्या बनवण्याच्या कामामध्ये मेहनत मोठी आणि कमाई छोटी असल्यामुळे हा व्यवसाय परवडत नाही. हा व्यवसाय पूर्वीपासूनचा आहे म्हणून आम्ही करत असल्याचे मत लष्कर येतील बाबू लक्ष्मण कुंभार यांनी व्यक्त केले.

# बार्शी शहरातील रस्ते डांबरीकरण व गटारी बांधणी कामाचा शुभारंभ

**बार्शी, (प्रतिनिधी) :** नगर परिषदेच्या वतीने बार्शी शहरातील पांडे चौक, भीम नगर, हांडे गल्ली या भागातील १ कोटी, २० लाख, २२ हजार, ८२४ रुपये किमतींच्या रस्ते डांबरीकरण व गटार बांधणी कामाचा आमदार राजेंद्र राऊत यांच्या हस्ते शुभारंभ. करण्यात आला यावेळी आमदार राजेंद्र राऊत बोलताना म्हणाले की बार्शी शहरात आमच्या सत्तेच्या कारकिर्दीत साडे चार वर्षांमध्ये शेकडो कोटी रुपयांची विकास कामे करण्यात आली व भविष्यकाळातील जवळपास २० कोटी रुपयांची कामे सुरू होणार आहेत. बार्शी शहरातील नागरिकांकरिता प्राथमिक सुविधा, प्राथमिक गरजा पूर्ण करण्याचा आम्ही नगरपालिकेच्या माध्यमातून प्रयत्न केला. हे कामे करीत असताना शहरातील अविकसित भाग व शहराचा जुना गावठाण भागात ही अनेक प्रकारची रस्ते, गटारी, दिवाबत्ती, भुयारी गटार योजना आदी विकास कामे करण्यात आली. पावसाळ्याच्या मागील चार महिन्यात अनेक विकास कामे पावसामुळे थांबली होती. परंतु आता पावसाळा संपल्यानंतर शहरातील विविध भागात विकास कामे वेगाने सुरू होणार आहेत व अर्धवट राहिलेली विकास कामेही पूर्ण होणार आहेत. बार्शी शहरातील नागरिकांनी विकास कामांच्या बाबतीत निश्चिंतपणे राहावे, कोणतीही काळजी करू नये. शहराच्या प्रत्येक भागातील रस्ते, गटारी, दिवाबत्तीची कामे पूर्ण केली जातील असेही आमदार राजेंद्र राऊत म्हणाले. ही विकास कामे सुरू असताना बार्शीकर नागरिकांना थोड्याफार प्रमाणात त्रास झाला, याबद्दल आम्ही त्यांची दिलगिरी व्यक्त करतो. नगर परिषदेच्या निवडणुकीत दिलेल्या वचननामधील विकास कामे बार्शीकर नागरिकांकरिता पूर्णत्वाकडे नेत आहेत, त्यांनी आमच्यावर टाकलेला विश्वास सार्थ ठरवत आहोत याचा आम्हाला अभिमान आहे.

यावेळी नगराध्यक्ष आसिफभाई तांबोळी, माजी नगराध्यक्ष रमेश पाटील, नगरसेवक विलास आप्पा रेणके, आण्णासाहेब लोंढे, प्रशांत कथले, सुभाष शेठ लोढा, तानाजी बापू गव्हाणे, भिमजी पवार, किसन आप्पा पवार, नंदकुमार वायकुळे, दादासाहेब हांडे, विष्णू गुंड, हमू वायकुळे, नाना गाडे, भारत गाडे, आबासाहेब हांडे, प्रमोद धुमाळ, नागनाथ अडसूळ, बाजार समितीचे संचालक रावसाहेब मनगिरे, उपनगराध्यक्ष कृष्णराज बारबोले, पक्षनेते विजय नाना राऊत, नगरसेविका रजियाताई बागवान, आशाताई लोंढे, रोहित लाकाळ उपस्थित होते.


**बार्शी नगरपरिषद, बार्शी.**

**(आरोग्य विभाग)**

**जाहीर ई–निविदा सूचना क्र.१**

**सन २०२१–२०२२**

Main portal : http//www.mahatenders.gov.in

बार्शी नगरपरिषद खालील नमूद केलेल्या कामाची ई प्रणाली अंतर्गत बाबनिहाय दराच्या निविदा मागवीत आहे. सदर कामासाठी आवश्यक असणारी पात्रता त्या कामांच्या अटी व शर्तीमध्ये नमूद करणेत आलेल्या आहेत. सदर अटी व शर्ती प्रमाणे निविदेची कागदपत्रे अपलोड करणे बंधनकारक आहे. जर अटी व शर्तीप्रमाणे कागदपत्राची पूर्तता न झालेस आपली निविदा उघडण्यात येणार नाही. सदर खालील कामाची कमी अथवा जादा दराची निविदा मंजूर करणेचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे. त्याची कारणे दिली जाणार नाहीत.

| अ. क्र. | कामाचा तपशील | अंदाजे कामाची रक्कम | निविदा फॉर्म किंमत | बयाणा रक्कम | सुरक्षित ठेव | कामाची मुदत | टेंडर प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ) | बार्शी शहरातील घंटागाडीद्वारे ओला व सुका कचरा वेगवेगळा गोळा करून कचरा डेपोवर टाकणे. अंदाजे २८००० मालमत्ता (दर प्रति मालमत्ता प्रति माह भरणेचा आहे.) | २,६६,२८,०००/– | १०,०००/– | १% | ४% बिलातून | १ वर्ष | सर्वात कमी दराने |
| ब) | बार्शी शहरातील रस्ते झाडकाम करून साफसफाई करणे. (दर प्रति १००० चौ.मी. ची देणेचा आहे.) | १,७८,५६,०००/– | | | | | |
| क) | बार्शी शहरातील न.पा. कर्मचारी यांनी गटारीतून बाहेर काढलेला राडारोडा उचलून कचरा डेपावर टाकणे. (दर प्रति घन मीटर भरणेचा आहे.) | २,९७,८८,८१२/– | | | | | |

**ई निविदा वेळापत्रक**

| अ.क्र. | तपशील | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १) | दस्तऐवज डाऊनलोडिंग करण्याची सुरूवात | २२/१०/२०२१ | दुपारी ४.०० वाजलेपासून |
| २) | निविदा सादर करण्याची सुरूवात | २२/१०/२०२१ | दुपारी ४.०० वाजलेपासून |
| ३) | निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक | १६/११/२०२१ | दुपारी ३.०० वाजेपर्यंत |
| ४) | निविदा उघडण्याचा दिनांक (तांत्रिक) | १७/११/२०२१ | दुपारी ४.०० वाजता (शक्य झालेस) |

१. सर्व पात्र / इच्छुक निविदाधारकांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेणेसाठी ई–निविदा प्रणालीच्या main portal : http//www.mahatenders.gov.in या संकेतस्थळाचा वापर करावा.
२. निविदाधारकांनी वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाइन देकार भरणे संदर्भात टोल फ्री नंबर (१८००–२३३–७३१५) वर संपर्क साधावा.
३. निविदाधारकांनी निविदा संदर्भात सर्व दस्त ऐवज ऑनलाइन सादर करणे अनिवार्य राहील. तसेच बयाणा रक्कम व निविदा खरेदीची रक्कम ऑनलाइनवर जमा केलेली पावती कागदपत्रासोबत देणे आवश्यक आहे. अन्यथा ऑनलाइन निविदा उघडणेत येणार नाही याची नोंद घ्यावी.
४. इतर अटी व शर्ती ई–निविदा नमुन्यामध्ये पाहावयास मिळतील. एक अथवा सर्व ई–निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवलेले आहेत.

**सही/–**
**मुख्याधिकारी**
**बार्शी नगरपरिषद, बार्शी.**


# रा. स्व. संघाचे काम तळागाळातील शेवटच्या व्यक्तींपर्यंत पोहोचविण्यासाठी आपण कार्यरत राहावे : राजाभाऊ देशमुख

**मोहोळ, (प्रतिनिधी) :** हिंदू संघटन करण्याबरोबर मनुष्य निर्माण आणि राष्ट्र निर्माण करण्याचे महान कार्य रा. स्व. संघ करीत आहे. अशा जगातील एकमेव संघटनेला सन २०२५ मध्ये १०० वर्षे पूर्ण होत आहेत. अशा संघटनेचे आपण कार्यकर्ते आहोत हे आपले भाग्य आहे. संघाचे काम तळागाळातील शेवटच्या व्यक्तींपर्यंत पोहोचविण्यासाठी आपण कार्यरत राहिले पाहिजे, असे प्रतिपादन रा. स्व.संघाचे माजी तालुका कार्यवाह आणि ज्येष्ठ स्वयंसेवक माधव तथा राजाभाऊ देशमुख यांनी केले. रा. स्व.संघाच्या मोहोळ शाखेचा विजयादशमी आणि शस्त्रपूजन उत्सव गुरुवारी २० ऑक्टोबर रोजी मार्केट यार्डात सायंकाळी पार पडला. त्यावेळी प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. सुरुवातीला ध्वजारोहण झाल्यावर पद्यगायन झाले. त्यानंतर सूर्यनमस्कार, घोष, आदींची प्रात्यक्षिके झाली. त्यानंतर शस्त्र पूजन करण्यात आले. पुढे बोलताना ते म्हणाले, की संघ समाजापेक्षा वेगळा नाही. संघाचे काम समाजासाठीच आहे. १०० वर्षे पूर्ण करीत असताना संघाने सर्व क्षेत्रात अतिशय व्यापक स्वरूपाचे काम उभे केले आहे. या सर्व कामातून हिंदू समाजाचे संघटन करण्याबरोबरच मनुष्य निर्माण करण्याचे काम अव्याहतपणे सुरू आहे. ते अधिक प्रभावीपणे करण्याचा संकल्प या निमिताने आपण करू या असेही शेवटी श्री. देशमुख म्हणाले. शेवटी प्रार्थनेनंतर या उत्सवाची सांगता झाली. दोन वर्षे कोविडमुळे हे कार्यक्रम झाले नव्हते. त्यामुळे यावेळी घोषवादन झाल्यानंतर संचलन सुरू झाल्याची चर्चा मोहोळमध्ये सुरू झाली. आणि तशी विचारणाही मोहोळकर नागरिकानी यावेळी केली. यामुळे संचलन हा प्रकार किती लोकप्रिय आहे हेही सर्वांच्य लक्षात आले. कार्यक्रमास तरुण, बाल, शिशू मिळून १५० स्वयंसेवक उपस्थित होते.

# वृद्ध महिलेला फसवून, दागिने केले लंपास

**बार्शी, (प्रतिनिधी) :** बार्शी शहरात दिवसेन दिवस चोरीचे प्रमाण वाढू लागले आहे.शहरात होणारया लहान, मोठ्या चोऱ्या होत असून आता चोरट्यांनी आता वृद्ध महिलांला गोड बोलून सोने लुटण्याचा प्रकार सुरु झाला आहे. नुकतेच बार्शी शहरात सरस्वती जालिंदर कशीद वय ७५ रा. कळमन, जिल्हा. सोलापुर. सध्या जावई रावसाहेब शीतोळे रा. कळमन. यांच्या कडे राहत आहे. सदर चोरीस गेलेल्या ऐवजामध्ये वृद्ध महिलेच्या गळ्यातील १४ ग्रॅमचे दागिने व रोख रक्कम तीनशे असा एकूण ५५३०० इतक्या किमतीचा ऐवजाचा समावेश आहे. अज्ञात व्यक्ती विरूध्द बार्शी पोलिसात तक्रार दाखल झाली असून पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक गजानन करनेवाड हे करीत आहेत.